| | | | |
|---|---|---|---|
| MHKO030034652025 | दाखल तारीख | - | १५.०२.२०२५ |
| | नोंदणी तारीख | - | १५.०२.२०२५ |
| | निकाल तारीख | - | ०४.०८.२०२६ |
| | कालावधी | - | ०१ वर्षे ०५ महिने २० दिवस |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.०३, कोल्हापूर यांचे न्यायालयात**
**(पिठासिन अधिकारी अ.वि. मुसळे)**

**नियमीत फौजदारी खटला क्र.२३१/२०२५**
**नि.क्र.१५/ब**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | महाराष्ट्र शासन तर्फे जुना राजवाडा पोलिस ठाणे |
| अभियोग पक्षातर्फे | | श्रीमती एस.एस. चव्हाण, सहा. सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | | **मयुरेश अमर पाटील**<br>वय – २४ वर्षे, धंदा - मजुरी<br>रा. ई वॉर्ड, ५१७, प्लॉट नं.३४,<br>शिवाजी पार्क, कोल्हापूर. |
| आरोपींतर्फे वकील | | श्री.एस.एस. चौगले |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | | दिनांक ०५.०८.२०२४ रोजीचे रात्री १०.०० वा पासून ते दि.०६/०८/२०२४ रोजीचे सकाळी ७.०० वा च्या दरम्यान मुदतीत. |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | | ५२९/२०२४ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | | २७.१२.२०२४ |
| दोषारोप नोंदविलेचा दिनांक | | ०२.०७.२०२६ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | | ०४.०८.२०२६ |
| युक्तिवाद दिनांक | | ०४.०८.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | | ०४.०८.२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | | आरोपीची निर्दोष मुक्तता |

## आरोपीची माहिती

| **आरोपी** | |
|---|---|
| आरोपीचे नांव | **मयुरेश अमर पाटील** |
| आरोपीस अटक दिनांक | १७.११.२०२४ |
| आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | १९.११.२०२४ |
| दोषारोपातील कलम | भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे |
| आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | निर्दोष मुक्तता |
| आरोपीस झालेली शिक्षा | --- |
| भा.ना.सु.संहिता-२०२३ चे कलम ४६८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा | --- |

### अ. अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | राहुल चंद्रकांत पिराळे | ११ | फिर्यादी |

### ब. बचावपक्षाने घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | - | - | - |

### क. न्यायालयाने घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | - | - | - |

## सरकारपक्षाचे / बचाव पक्षाचे / न्यायालयाचे दस्तऐवज क्रमांक

### अ. सरकारपक्षाचे दस्तऐवज

| अ.क्र. | दस्ताचा तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | फिर्यादवरील सही | १२ |
| २ | छापील प्रथम खबरी अहवालारील सही | १३ |

**ब. बचावपक्षाचे दस्तऐवज**

| अ.क्र. | दस्ताचा तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | --- | |

**क. न्यायालयीन दस्तऐवज**

| अ.क्र. | दस्ताचा तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | -- | -- |

**ड. मटेरीयल ऑब्जेक्ट**

| अ.क्र. | दस्ताचा तपशील | तपशील |
|---|---|---|
| १. | एक काळया कलरची ॲक्टीव्हा क्रमांक एम.एच.-०९-डी.एफ.-४६०५ तिचा चेसिस नं.ME4JE501CE88 14789 व इंजिन नं.JE50E80813727 सन-२०१४ सालाची जुनी वापरती. | र.रु.२६९०/- |

**न्या य नि र्ण य**

(घोषित दिनांक ०४ ऑगस्ट, २०२६)

आरोपीविरुध्द् भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२) अन्वये अपराध केल्याची चौकशी झालेली आहे.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन पुढील प्रमाणे** -

**०२.** दिनांक ०५/०८/२०२४ रोजी रात्री १०.०० ते दिनांक ०६/०८/२०२४ रोजीच्या सकाळी ७.०० वाजताचे दरम्यान मुदतीत १०५३, 'बी' वॉर्ड, राजशंकर अपार्टमेंट, शिवाजी स्टेडीयम, टेंबे रोड, कोल्हापूर येथील फिर्यादीच्या राहत्या घराच्या दारातुन फिर्यादीच्या मालकीची पार्कींग केलेली ॲक्टीव्हा मोपेड क्र.एम.एच.०९-डी.एफ-४६०५ ही आरोपीने फिर्यादीच्या संमती शिवाय, लबाडीच्या इराद्याने चोरुन नेली. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुध्द जुना राजवाडा पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली.

## - अन्वेषण व दोषारोप -

**०३.** दिनांक ०७.०८.२०२४ रोजी फिर्यादी राहुल चंद्रकांत पिराळे यांनी राजारामपुरी पोलीस ठाणे येथे हजर राहुन जबाब दिला, तो नोंदवली व त्यावरुन दखलपात्र अपराध घडल्याचे निदर्षनास आल्यामुळे पहिली खबर क्रमांक ५२९/२०२४ वरील कलमखाली नोंदविण्यात आली. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल ब.नं.१३७९ श्री.यु.बी. काटकर, जुना राजवाडा पोलिस ठाणे यांनी केला. अन्वेषणा दरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले, घटनास्थळ व मुददेमाल जप्तीचा पंचनामा तयार केला. वरील आरोपींविरुध्द तपास पुर्ण केल्यानंतर भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १९३ अन्वये अंतिम अहवाल न्यायालयात दाखल करण्यात आला. चौकशी दरम्यान आरोपीस जामीनावर खुले करण्यात आले होते.

**०४.** अंतिम अहवाल व इतर कागदपत्रे पाहिल्यानंतर आरोपीचा दोषारोप **(नि.क्र.९)** नोंदवण्यात आला. सदरचा दोषारोप आरोपीस वाचून दाखविण्यात आला व समजावून सांगण्यात आला. आरोपीने सदर अपराध कबुल नाही असे नोंदविले व तिच्याविरुध्द संपरिक्षा चालविण्याची मागणी केली. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी राहुल चंद्रकांत पिराळे **(अ.सा.क्र.१/नि.क्र.११)** यांना तपासण्यात आले व अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून न आल्याने आरोपीची भा.ना.सु.सं. कलम ३५१ प्रमाणे निवेदन नोंदवण्यात आलेले नाही.

## - मुद्याप्रश्न व निष्कर्ष -

**०५.** अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती एस.एस. चव्हाण व आरोपीतर्फे विद्वान वकील श्री.एस.एस. चौगले यांचा युक्तिवाद ऐकला. वरील सर्व बाबींचा विचार केल्यानंतर व दोन्ही पक्षांचा सखोल युक्तीवाद ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे निर्णयीत करावयाचे वादप्रश्न उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| अ.क्र | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, कथित तारीख, ठिकाण आणि वेळेस, आरोपीने फिर्यादीच्या संमती शिवाय, लबाडीच्या इराद्याने त्यांच्या मालकीची ॲक्टीव्हा मोपेड क्र.एम.एच.०९-डी.एफ-४६०५ ही चोरुन नेली व त्यायोगे भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा केला ? | नाही.... |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशान्वये |

## का र ण मि मां सा

### मुद्या क्रमांक १ करिता:-

**०६.** अभियोगपक्षाने संबंधित अधिनियमातील कलमांच्या परिभाषेत आरोपीचे कृत्य येते हे शंकेपलिकडे सिध्द् करणे आवश्यक आहे. हे पाहण्याकरीता अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

**०७.** प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी साक्षीदार क्र.१ राहुल चंद्रकांत पिराळे (अ.सा.क्र.१) यांच्या पुराव्यात त्यांनी कथन केले की, दिनांक ०६/०८/२०२४ रोजी त्यांची नेहमीच्या ठिकाणी लावण्यात आलेली गाडी दिसून न आल्यामुळे त्यांनी तक्रार दिली होती. त्यांच्यापूर्व कथनांशी विसंगत अशी साक्ष देत असल्याने त्यांना १५७ भारतीय पुरावा कायदा अंतर्गत उलट तपास घेवून घटनेची माहिती विचारण्यात आली असता, त्यामुळे, पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. त्यांनी उलटतपासामध्ये हि बाब मान्य केली की, तक्रार हि अज्ञान इसमाविरुध्द दिली होती व त्यांना त्यांची गाडी परत मिळाल्यामुळे प्रस्तुतचा खटला पुढे चालवायचा नाही व त्यांची कोणाही विरुध्द कुठलीही तक्रार राहिलेली नाही. वरील पुराव्यांवरुन असे दिसून येते की, मुळात फिर्यादी यांना त्याची गाडी कोणी चोरली हे माहीत नाही, आरोपीने गाडी चोरली हे देखील ते सांगू शकलेले नाही. त्यामुळे आरोपीने फिर्यादीच्या मालकीची मोटरसायकल चोरली होती किंवा नाही याबाबत संशय निर्माण होता. अशाप्रकारे यातील फिर्यादी यांनी

विसंगत पुरावा दिल्यामुळे अभियोगपक्ष त्यांची बाजू सबळपणे मांडू शकले नाही व फिर्याद ही सिध्द झाली नाही. आरोपीने फिर्यादीच्या राहत्या घराच्या दारातुन ॲक्टीव्हा मोपेड क्र.एम.एच.०९-डी.एफ-४६०५ ही फिर्यादीच्या संमती शिवाय, लबाडीच्या इराद्याने चोरुन नेले, हे संशयापलीकडे सिध्द झाले नाही. सबब मुद्दा क्रं.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुददा क्रमांक २ करीता</u> -

**०८.** मुददा क्र.१ च्या निष्कर्षांती आरोपीविरुध्द् गुन्हा सिध्द् झालेला नाही. त्यामुळे आरोपी हा दोषारोपाप्रमाणे त्याच्यावर असलेल्या गुन्हयांमधून निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. तसेच जप्त मुद्देमाल एक काळया कलरची ॲक्टीव्हा क्रमांक एम.एच.-०९-डी.एफ.-४६०५ तिचा चेसिस नं.ME4JE501CE8814789 व इंजिन नं.JE50E80 813727 सन-२०१४ सालाची जुनी वापरती ही फिर्यादीस परत केली असून त्याबाबत सुपूर्तनामा हा अपील कालावधीनंतर विसर्जित करणे आवश्यक आहे. सबब, मुददा क्र.२ चे निष्कर्षादाखल खालील आदेश पारीत करण्यात येत आहेत.

<u>आदेश</u>

१. आरोपी **मयुरेश अमर पाटील** यास भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२) च्या अपराधातून भा.ना.सु.संहिता, २०२३ चे कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे बंधपत्र व त्यानी दिलेला जामीन कदबा रद्द करण्यात आला आहे.

३. आरोपीस आदेशीत करणेत येते की, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ प्रमाणे रक्कम रुपये ५,०००/- इतक्या रकमेचा वैयक्तीक जातमुचलका व तेवढयाच रकमेचा जामीन दयावा.

४. सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल एक काळया कलरची ॲक्टीव्हा क्रमांक एम.एच.-०९-डी.एफ.-४६०५ तिचा चेसिस नं.ME4JE501CE88 14789 व इंजिन नं.JE50E80813727 सन-२०१४ सालाची जुनी वापरती ही फिर्यादीस परत केली असून त्याबाबत सुपूर्तनामा हा अपिल कालावधीनंतर विसर्जित करण्यात यावा.

५. मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील रंजना शांतिलाल सुर्यवंशी विरुध्द जयप्रकाश तुळशीराम गुप्ता क्रिमी.अपिल (एस.टी.) नंबर ३९०/२०१९ या न्यायनिवाडयात निर्देशित केलेप्रमाणे प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडे पाठविणेत यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

Digitally signed by ANIKET MUSALE
Date: 2026.08.04 17:41:35 +0530

कोल्हापूर. (अ.वि. मुसळे)
दिनांक ०४/०८/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०३, कोल्हापूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M. R. Khatib |
| Court Name | : | J.M.F.C., Court no.3, Kolhapur. |
| Date | : | 04/08/2026 |
| Order signed by the Presiding Officer On | : | 04/08/2026 |
| Order uploaded on | : | 04/08/2026 |